


## माजी खासदार निवेदिता माने यांच्या संपत्तीची चौकशी करा

जयसिंगपूर (प्रतिनिधी)ः माजी खासदार स्वतःचा लोकसभेतील निवडणुकीतील झालेला पराभव अद्याप विसरलेल्या नाहीत. खा. शेट्टींच्या गाडीची मापे काढणारे माजी खासदार निवेदिता माने (वहिनी) व खासदार राजू शेट्टी या दोघांच्याही संपत्तीची चौकशी सीआयडी मार्फत करून जनेतेपुढे जाहीर करावे, त्यांनतरच खरे गौडबंगाल बाहेर पडेल, अशी मागणी कोल्हापूर जिल्हा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष भगवान काटे यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या येथील जिल्हा बैठकीत केली.

ते म्हणाले की, निवेदिता माने यांनी आपल्या खासदारकीच्या कारकिर्दीत काय दिवे लावले आहेत, हे सगळ्यांना माहित आहे. खा. राजू शेट्टी शेतकऱ्यांच्यांतूनच वर आलेले आहेत. स्वाभिमानी शेतकरी संघटनेची पंढरपूर ते बारामती ही संघर्ष यात्रा येणार होती. त्यांच्या वरदहस्ताखाली असलेल्या साखर कारखान्यांचा गाळप आंदोलनामुळे बंद झालेला होता. याचाच धसका घेऊन खुद्द कृषीमंत्री शरद पवार यांनीच आंदोलन मिटवण्यासाठी पुढाकार घेतला होता. साखर संघाच्या कार्यालयात सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील, साखर संघाचे अध्यक्ष विजयसिंह मोहिते - पाटील यांच्याच अध्यतेखाली तिन्ही संघटनेच्या नेत्यांच्या उपस्थितच दराचा प्रश्न निकाली काढलेला आहे. तसेच चर्चेचा प्रत्येक मसुदा कृषीमंत्री शरद पवार यांना देत होते. याला शरद पवार व मुख्यमंत्र्यांनी १८०० रूपयेला मान्यता दिलेली आहे. मग शेट्टींच्या गाडीला शरद पवार यांनी पैसे दिलेले आहेत का ? असे त्यांना म्हणायचे आहे का? खासदार राजू शेट्टींचे चरित्र उघडच आहे. शेतकऱ्यांनी दिलेली गाडी जुनी झालेली आहे. शेट्टींचा राज्यात दौरा असतो. म्हणून कर्ज काढून २१ लाख रूपयांची गाडी डिझेल घालून दारात आणलेली आहे. ४० लाखांची नव्हे. कुणीही येऊन जयसिंगपूर येथील बँक ऑफ इंडियाच्या शाखेत जाऊन शेट्टींच्या खात्यावरील कर्ज पहावे. मगच गरळ ओकावी. अलिशान महालात राहून जनतेचा विश्वास गमावलेल्यांनी आम्हाला शहाणपण शिकवू नये. जतनेला माहित आहे की कुणा ची संपत्ती किती आहे ते. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष उल्हास पाटील, सावकर मादनाईक, शिरोळ तालुकाध्यक्ष अण्णासो चौगुले, उपाध्यक्ष आदिनाथ हेमगिरे आदी उपस्थित होते.

स्वाभिमानी विचार

Book-Post

प्रति,

RNI No. - MAH/MAR/2005/16213     Rgd. No.L2/17/RNP/ K.L.P/234/09-11

वर्ष ६ | अंक ३ | १ जानेवारी २०११ | किंमत ५ रुपये | पाने २०

# स्वाभिमानी विचार

RNI NO-MAH/MAR/2005/16213
REGD NO - K.L.P/234/09-11

संपादक : खासदार राजू शेट्टी

## 'स्वाभिमानी अॅग्रो'ची सुखद वाटचाल

खासदार राजू शेट्टी



शेतकऱ्यांना वर्षभर शेतात काबाड करून शेतात घाम गाळून, कच्चा शेतीमाल बाजारात विकून, बाजारपेठ, शासकीय धोरण, व्यापारी व दलाल यांच्याशी संघर्ष करून शेतीमालाला भाव मिळवावा लागतो. स्वाभिमानी शेतकरी संघटनेने शेतकऱ्यांच्या हितासाठी व त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी अनेक आंदोलने केली. शेतकऱ्यांच्या शेतीमलाला योग्य भाव मिळावा म्हणून प्रस्थापितांविरूध्द अनेक वेळा दोन हात केले. दूध व ऊस आंदोलन करून त्यांच्या पदरात चार पैसे पडावेत, यासाठी संघटनेने प्रयत्न केला. तसेच यामध्ये संघटनेला मोठ्या प्रमाणात यशही मिळाले.

पान १० वर ▸

## 'स्वाभिमानी'मुळे शेतकऱ्यांना ३००० कोटीचा फायदा

जयसिंगपूर (प्रतिनिधी)ः स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या ऊस आंदोलनामुळे राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ३००० कोटी रूपयांचा फायदा झालेला आहे. साखर कारखान्यातील भ्रष्टाचार रोखण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटना अधिक आक्रमकपणे आंदोलन करेल, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते खासदार राजू शेट्टी यांनी दिला, ते जयसिंगपूर येथे घेण्यात आलेल्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या राज्य कार्यकारणीच्या बैठकीत बोलत होते. प्रदेशाध्यक्ष सदाभाऊ खोत यांची प्रमुख उपस्थिती होती. खासदार शेट्टी म्हणाले की, संघटनेला ऊस आंदोलनात भरघोस यश मिळालेले आहे. हे कृषीमंत्र्यांना चपराक असून त्यांनाही संघटनेच्या ताकदीचा अंदाज आलेला आहे. स्वाभिमानी शेतकरी

पान ११ वर ▸





# बंद पडलेलं घड्याळ

नुकताच माजी खासदार श्रीमती माने यांनी खासदार राजू शेट्टींच्या गाडीची मापे काढली. लोकसभा मिवडणुकीमध्ये खासदार राजू शेट्टींनी श्रीमती माने यांचा ९५०६० मतांनी पराभन केला. हा पराभव श्रीमती मानेंच्या फारच जिव्हारी लागलेला आहे. खासदार राजू शेट्टी यांच्या गाडीची मापे काढून आंदोलनाचा फुसका बाप झालेला आहे. असे त्या म्हणत आहेत. हसन मुश्रीफ यांच्या पोटात आता दुखू लागले आहे. मुश्रीफ कोणामुळे आमदार झाले आहेत,हे विसरले आहेत वाटते. खासदार राजू शेट्टींच्या कार्याची पोहपावती जनतेनी दिलेली आहे. कुणाच्या शिफारशीची आम्हाला कदापिही गरज नाही.

स्वाभिमानी शेतकरी संघटमेने राज्यभर आंदोलन करून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ३००० कोटी रूपयांचा फायदा करून दिलेला आहे. कृषीमंत्र्यांना जोरदार चपराक हाणलेली आहे. त्यांच्याच वरद-हस्ताखाली असलेल्या साखर कारखान्यांचा गाळप हंगाम स्वाभिमानी शेतकरी संघटनेने बंद पाडला होता. त्यामुळेच त्यांच्या पोटात भितीचा गोळा उठलेला होता. त्यांनीच पुढाकार घेऊन ऊसदराचा प्रश्न निकाली काढलेला आहे. मग आता वहिनी नि मुश्रीफांच्या पोटात आकडा का उभा झालेला आहे. शेतकऱ्यांची ताकद काय असते ते कृषीमंत्र्यांना माहिती करून दिलेले आहे. राज्यातील सर्व साखर सम्राटांनी मान टाकलेली आहे. खासदार राजू शेट्टी आजही पत्र्याच्या घरात राहत आहेत. एवढ्या मोठ्या पदावर जाऊनही त्यांनी आपले मागील दिवस विसरलेले नाहीत. खा. शेट्टींना राज्यभर दौरा करावयाच असतो. शेतकऱ्यांनी दिलेली गाडी जुनी झालेली आहे. म्हणून कर्ज काढून नवी गाडी घेतलेली आहे. शेतकऱ्यांना माहित आहे की कोण किती पाण्यात आहे ते. शेतकऱ्यांच्या जीवनात राजू शेट्टींनी सुखीचे दिवस आणलेले आहेत. ऊस आंदोलनाचा लाभ सगळ्यानांच झालेला आहे. अगदी श्रीमती माने यांनाही झालेला आहे. कारण त्यांचीची शेती आहे. त्यांचाही ऊस गेलेला आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेने आंदोलन केले नसते तर उसाला १५०० रूपये प्रतिटन भाव दिला असता. मात्र राजू शेट्टींनी केलेल्या ऊस आंदोलनामुळे दस्तुरखुद्द माने वहिनींनाही याचा फायदा झालेला आहे. ऊस आंदोलमामुळे सर्व विरोधकांच्या पोटात दुखू लाग-लेले आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेने शेतकऱ्यांच्यासाठी राजकारण केलेले आहे. स्वाभिमानी च्या आंदोलमापुढए बारामतीही वाकली गेलेली आहे. हे धान्यात ठेवले पाहिजे. शेतकऱ्यांच्या हितासाठी व त्यांच्या भल्यासाठीच स्वाभिमानी शेतकरी संघटना झगडत आहे. खासदार राजू शेट्टींची कुणीही कधीही चौकशी करावी, खासदार राजू शेट्टींची काही घराणेशाही नाही. त्यांच्या घरातला माणूस राजकारणात नाही. श्रीमती माने यांनी आपल्या मुलाला पदे मिळण्यासाठी किती प्रयत्न केले आहेत. हे सर्वज्ञात आहे. त्यांचा मुलगा जिल्हा परिषद उपाध्यक्ष आहे. त्यांचे अख्खे घराणे राजकाराणात आहे. जनतेने निवडून दिल्यामुळे राजू शेट्टी खासदार झाले आहेत. पक्षश्रेष्ठींच्या आशिर्वादामुळे खासदार झालेले नाहीत. मिष्क्रिय झाल्यामुळेच श्रीमती मानें यांचा लोकसभा निवडणुकीत पराभव झालेला आहे. माने वहिनींनी पुढील

शेतकरी संघटना स्वाभिमानी

◆ वर्ष ६ ◆ अंक ३ ◆१ जानेवारी २०११ ◆ **संपादक :** खासदार राजू शेट्टी Email : rajushetti@gmail.com
◆ **कार्यकारी संपादक : डॉ. महावीर अक्कोळे ◆ सहसंपादक : डॉ. श्रीवर्धन पाटील, जगदीश इनामदार,**
◆**मानद सल्लागार : मा. श्री. अण्णा हजारे** राळेगणसिद्धी, **न्या. पी. बी. सावंत** पुणे, **न्या.बी.जी.कोळसे पाटील** पुणे, . **प्रा. शरद पाटील** सांगली, **कुमार सप्तर्षी** पुणे, **माजी आमदार. वामनराव चटप** चंद्रपूर
◆ **व्यवस्थापक :** सुभाष शेट्टी ◆ **कार्यालय :** भरत पतसंस्थेच्या माडीवर, पोलीस स्टेशनसमोर, जयसिंगपूर, ता. शिरोळ. फोन : (०२३२२) २२४३२७

**SWABHIMANI VICHAR (Fortnightly)** स्वाभिमानी प्रतिष्ठान संचलित पाक्षिक स्वाभिमानी विचार हे पत्र संपादक *खासदार राजू उर्फ देवाप्पा आण्णा शेट्टी यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, पोलिस स्टेशननजीक, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर, (महाराष्ट्र राज्य) येथे प्रकाशित केले. प्रकाशन स्थळ : स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र राज्य). दूरध्वनी : (०२३२२) २२४३२७. मुद्रण स्थळ : सुनील प्रिंटर्स, जयसिंगपूर. फोन (०२३२२) २२४३२७ पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी * यांची आहे. पाक्षिक स्वाभिमानी विचारमधील सर्व लेखांचे हक्क राखून ठेवण्यात आलेले आहेत. **Decleration No. Desk No. VII Home N.P.S.R./58/2005 RNI No. MAH/MAR/2005/16213 या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.**

वार्षिक वर्गणी रु. १००/-

## बंद पडलेलं घड्याळ

वर्षे ऊस आंदोलनात उतरावे नि शेतकऱ्यांच्या घामाला योग्य न्याय मिळवून द्यावा मगच राजू शेट्टींवर टिका करावी. काचेच्या घरात राहून खासदार राजू शेट्टींच्यावर टीका करणे बंद करावे.

स्वाभिमानी शेतकरी संघटना आणि स्वाभिमानी पक्षाने शेतकऱ्यांना व ग्रामीण जनतेला न्याय मिळावा, यासाठी सरकारशी दोन हात करून नेहमी झगडण्याचा प्रयत्न केला आहे. अनेक आंदोलने यशस्वी केलेली आहेत. प्रस्थापिताविरूध्द झगडून राजू शेट्टींनी साखर सम्राटांना सळो की पळो करून सोडले आहे. शेतकऱ्यांना योग्य न्याय देऊन त्यांच्या घामाचे दाम मिळवून देणारे खासदार राजू शेट्टी कुठल्या पक्षाशी बांधील नाहीत. श्रीमती माने वहिनींनी आता जिल्हा परिषदमध्ये लक्ष घालावे. निदान मुलाचे उपाध्यक्षपद तरी शाबूत राहिल.

## पुनर्वसन मागणीसाठी स्वाभिमानी चा आत्मक्लेषः गावकऱ्यांसह मारोतीच्या पारावर आंदोलन

बुलडाणा(स्वाभिमानी वृत्तसेवा)ः खडकपूर्णा प्रकल्पग्रस्तांमध्ये समाविष्ठ होणाऱ्या बायगाव खुर्द व मेहुणाराजा गावच्या पुर्नवसनासाठी, अखेर स्वाभिमानी शेतकरी संघटनेने त्या गावात जाऊन गावकऱ्यांसह आत्मक्लेष आंदोलन केले.

खडकपूर्णा प्रकल्पाचे काम झाले पण पुर्नवसन झाले नाही. बायगाव खुर्द व मेहुणाराजा गावात पाणी शिरले. इथली शेतजमीन वाहून शेतकऱ्यांचे नुकसान झाले. या दोन्ही गावातील शेतकऱ्यांनी वेळोवेळी निवेदने व वेगवेगळी आंदोलने करून पुर्नवसनासाठी शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. पण काहीही झाले नाही. स्वाभिमानी युवा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वाखाली बायगान खुर्द येथील मारोतीच्या पारावर आत्मक्लेष आंदोलन करण्यात आले. स्थानिक लोकप्रतिनिधी व पुढारी या प्रकल्पग्रस्तांसाठी काहीही करत नसल्याचा आरोप रविकांत तुपकर यांनी केला.

सकाळी ७ वाजता या आत्मक्लेष आंदोलनाची सुरूवात झाली. तत्पूर्वी शासनाचा निषेध करण्यासाठी गावातील प्रत्येक घरावर काळे झेंडे लावण्यात आले होते. अनेक कार्यकर्त्यांनी कपडे उतरून आंदोलन केले. आज आम्ही आमचे कपडे उतरवले, जर पुर्नवसनाचे काम तत्काळ झाले नाहीतर आम्ही उद्या अधिकाऱ्यांचेही कपडे उतरवू, असा इशारा यावेळी तुपकर यांनी दिला. या आंदोलनात स्वाभिमानी पक्षाचे जिल्हाध्यक्ष बबनराव चेके, स्वाभिमानी विद्यार्थी संघटनेचे राणा चंद्रशेखर चंदन, देऊळगावराजा तालुकाध्यक्ष मधुकर शिंगणे यांचेसह बायगाव खुर्द येथील वसंतराव दहातोंडे, आनंदा मुंढे, शे. बशीरभाई, मधुकर काकड, कासाबाई मुंढे, तुळसाबाई जाधव, सखाजी लिंगधारे, गणेश पालवे यांच्यासह हजारो ग्रामस्थ उपस्थित होते.

TEXMO
TEXMO INDUSTRIES
५२ वर्षांची विश्वासाची परंपरा
Taro
SKF Ball Bearings
BCH स्टार्टर
जैन एच.डी.पी.ई. पाईप्स

अधिकृत विक्रेते
बाहुबली इलेक्ट्रिकल्स
आझाद रोड, ८वी गल्ली, जयसिंगपूर.
फोन:(०२३२२)२२५९०५,२२७४०५ मोबा.:९४२११७३१४७
गोमटेश इलेक्ट्रिकल्स
जामे मस्जिद समोर, मेट्रो ऑटोजवळ, पटेल चौक, सांगली.
फोन नं.(०२३३) २६२१०९६ मोबा.:९९६०४०६३१३

TEXMO
AQUATEX
अधिकृत विक्रेते
श्री वितराग एंटरप्रायझेस
सोन्या मारुती मंदिरासमोर, कोल्हापूर रोड, इचलकरंजी
फोन : (ऑ.) ०२३०/ २४३१०८
मोबा. : विपुल - ९३२६९५३०२७ बाबासाहेब : ९३२५७६१२२९


प्रोप्रा. अरुण किर्तीकुमार माणगावे
M/S. MANGAVE BOREWELLS
BOREWELL CONTRACTOR
Opp. Mangave Petrol Pump. Jaysingpur. Dist : Kolhapur (M.S.)
Ph. (02322) 229866. Mo. 9822551008/9422428266

Shree Datta
Prestrestess
M.f. PCC Pole
Shirol Road, Jaysingpur.

# लोकवर्गणीतून वजन काटे उभारणार

## खासदार राजू शेट्टी; चालवण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे

विटा : आगामी काळात ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी लोकवर्गणी, लोकप्रतिनिधी यांच्या माध्यामातून वजन काटे उभे करणार असून ते चालविण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे देणार असल्याची माहिती खासदार राजू शेट्टी यांनी दिली. बारामतीकडे जात असताना येथील क्रांतिवीरांगणा हौसाताई पाटील यांच्या 'क्रांतिसिंह' निवासस्थानी पत्रकारांशी संवाद साधला.

खासदार शेट्टी म्हणाले, ''साखर कारखान्यांवर आजही काटमारी सुरू होत आहे. त्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटना गनिमी काव्याने आंदोलन उभे करणार आहे. काटमारी होत असल्याचे लक्षात घेऊन शेतकऱ्यांनी प्रायोगिक



तत्त्वावर लोकवर्गणी लाख खर्चून वजन काटे उभे करण्याचा निर्णय घेत आहेत. साखरसम्राटांनी चालू हगांमात अतिरिक्त उसाचा बागुलबुवा केला आहे. अतिरिक्त ऊस असल्याचे सांगून शेतकऱ्यांना लुटण्याचा उद्योग साखर कारखानदारांचा सुरू आहे.''

ते म्हणाले, ''सोमेश्वर येथील शेतकऱ्यांनी उभारलेल्या आंदोलनावर साखरसम्राटांनी प्रशासनाला हाताशी धरून गोळीबार केला. यामुळे साखर कारखानदार एकच असल्याचे निर्देशास येत आहे. सत्ताधारी ब्रिटिशांच्या नीतीने वाटचाल करीत असल्याचा आरोप त्यांनी केला.'' यावेळी श्रीमती हौसाताई पाटील, स्वांतत्र्यसैनिक सदाशिव पवार, ॲड. सुभाष पाटील, सुभाष पवार, प्रा. पांडुरंग शितोळे, गणेश शवाळे उपस्थित होते.


vishal Yadav 9850291294
9921151199

इंडो प्रिंटर सर्व्हिसेस



Dot Matrix Specialist

■ EPSON, TVS, WEP., HP ■ Sales & Services ■ Dot Matrix, Laser, Inkjet Printer Repairs ■ Printers Carteridges & Toner Refilling

चालू स्थितीतील जुने प्रिंटर मिळतील.

१ वी गल्ली, सुभाष रोड, देमापुरे ऑईल मिलजवळ, जयसिंगपूर

श्री भरत अर्बन को-ऑफ बँक लि., जयसिंगपूर

ता. शिरोळ, जि. कोल्हापूर फोन : २२५४३०, २२५७२२ २२९९२३ फॅक्स नं. : ०२३२२ २२५७२३

■ २८ हजारांवर सभासद ■ संस्थापक, संचालक व्यवस्थापन ■ सर्व शाखा कार्यालये स्वत:चे इमारतीत ■ अद्यावत कॉम्प्युटर सेवा ■ सर्व शाखांकडे लॉकर्सची सोय ■ लाखापर्यंतच्या ठेवीस विमा संरक्षण देशातील प्रमुख ४८८ शहरांवरील डी.डी.ची अल्प कमिशनमध्ये सोय ■ बँक सतत नफ्यात ■ ज्येष्ठ नागरिकांसाठी ठेवीवर १/२ टक्के जादा व्याज ■ १० ग्रॅम चोख सोन्यास रु. १४००० कर्ज १० टक्के व्याजदराने

| ठेवी | कर्जे | ऑडिट वर्ग | | स्वभांडवल | गुंतवणूक | एन.पी.ए. |
|---|---|---|---|---|---|---|
| ४१४७.९५ | २१७८.७१ | ---- | नफ्यात | ४५५.१५ | २१८९.४३ | ३.३७ टक्के |

श्री. व्ही. बी. हुग्गे.
बी. ए. बी. कॉम.
चिफ एक्झि ऑफिसर

श्री. अशोक शां रूणवाळ.
बी. कॉम
व्हा. चेअरमन
व सर्व संचालक

पै. विठ्ठल बाबूराव मोरे
एम. ए.
चेअरमन

# शेतकऱ्यांच्या आत्महत्या म्हणजे शासनाचा करंटेपणा

## खा.राजू शेट्टी यांचे अप्पाचीवाडी येथे शेतकरी मेळाव्यात प्रतिपादन

म्हाकवे : निसर्गाने शेतकऱ्यांवर अस्मानी-सुलतानी संकटे आणली; परंतु शेतकरी डगमगला नाही. महापूर, कोरडा दुष्काळ यामध्ये भरीत भर म्हणून अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या नुकसानीनेर शेतकरी कधी हतबल झाला नाही. परंतु, शासनाने राबविलेल्या धोरणाविरुद्ध लढाई करताना हरलेल्या शेतकऱ्यांनी आत्महत्येचा मार्ग स्वीकारला. शरेतकऱ्यांच्या आत्महत्या म्हणजे शासनाचा करंटेपणा असल्याचे प्रतिपादन खासदार राजू शेट्टी यांनी केले.

अप्पाचीवाडी, कुर्ली (ता. चिक्कोडी) येथील शेतकऱ्यांच्या वतीने शेतकरी मेळावा व खासदार राजू शेट्टी यांचा सत्काराचा संयुक्त कार्यक्रमात बोलत होते. अध्यक्षस्थानी शेतकरी संघटनेचे चिक्कोडी तालुकाध्यक्ष रमेश पाटील होते. यावेळी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष भगवान काटे, सतेज शेतकरी फार्मचे चंद्रकांत पोटले, जयवंत चौगुले आदी उपस्थित होते.

खासदार शेट्टी म्हणाले, ''काबाडकष्ट करून शेतकऱ्यांनी ऊस पिकवायचा. दराची, वजनकाट्याची चौकशी न करता तो कारखानदारांना घालायचा. शेतकऱ्यांनी दळायचं आणि कारखानदारांनी खायचं अशी




अप्पाचीवाडी (ता. चिक्कोडी) : येथील शेतकरी मेळाव्यात बोलताना खासदार राजू शेट्टी.शेजारी व्यासपीठावर उपस्थित मान्यवर,

अवस्था शेतकऱ्यांची झाली आहे. दरासाठी, वजनकाट्यासाठी आता शेतकऱ्यांनी बदलायला हवे. काट्याकुट्यांच्या संरक्षणासाठी पायात वापरावयाचे जोडे आता लुटारू कारखानदारांडून योग्य दर व वजन घेण्यासाठी वापरण्याची गरज आहे. सध्या निर्सगाचा समोतल बिघडत आहे. शेतकऱ्यांनी आता शेतीला आधुनिकतेची जोड द्यावी. हवामान बदलीच्या नोंदी ठेवाव्यात. शेतीमध्ये उत्पादन व गुणवत्ता वाढवून शेतीच्या खर्चाचा सामू काढण्याची गरज आहे. शेतीभावाला खर्चावर आधारित योग्य भाव घेण्यासाठी शेतकऱ्यांनी संघटित होणे गरजेचे आहे.'

खासदार शेट्टी यांच्या शेतकरी संघटनेच्या माध्यमातून सीमाभागातील कारखानदारीवर ऊसदर व काटामारीवर नियंत्रण आणले. याबद्दल खासदार शेट्टी यांचा अप्पाचीवाडी येथे कुर्ली, भाटनांगनूर, तसेच परिसरातील शेतकऱ्यांच्या वतीने नागरी सत्कार करण्यात आला. ढोल ताशांचा कडकडाट, तुतारीचा निनाद, फटाक्यांच्या आतषबाजीत त्यांचा सत्कार करून सीमावासीयांनी कृतज्ञता व्यक्त केली.

स्वागत, प्रास्ताविक जय चौगुले यांनी केले. जयवंत चौगुले, चंद्रकांत पोटले यांनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले. उपाध्यक्ष उल्हास पाटील, ॲड. खोत, कृषी सहायक सुकुमार झंगटे, सुहास कोगनोळे (गोरंबे) आदी उपस्थित होते. सुकुमार वंजोळे यांनी आभार मानले.

# किती साखर कारखान्यांनी क्षमताविस्तार केला?



मुंबई : राज्यातील किती सहकारी साखर कारखान्यांनी फेरबदलाच्या-आधुनिकीकरणाच्या नावाखाली क्षमतेचा विस्तार केला; तसेच सहकारी साखर कारखान्याशेजारी उभा राहिलेला खासगी साखर कारखाना जोमात चालला व शेजारचा सहकारी साखर कारखाना आजारी पडला अशी किती उदाहरणे आहेत त्याची माहिती आम्हाला द्या, असा आदेश उच्च न्यायालयाने आज अर्जदार अशोक कुलकर्णी यांना दिला.

आजारी कारखान्यांसंदर्भात कुलकर्णी यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका सादर केली आहे. तिची सुनावणी आज न्या. बी. एच. मर्लापल्ले व न्या. यू. डी. साळवी यांच्यासमोर झाली. खंडपीठाने आज विशेष नोटीस काढून कुलकर्णी यांना बाजू मांडण्यासाठी आपल्यासमोर बोलावले होते. या वेळी कुलकर्णी यांनी महालेखापरीक्षकांचे (सीएजी) अहवाल; तसेच न्यायालयाने यासंदर्भात नेमलेल्या शिवाजीराव देशमुख यांच्या अहवालाआधारे सद्यस्थिती खंडपीठासमोर मांडली. 'सीएजी'चा एप्रिल २००७ ते मार्च २०१० या कालावधीतील अहवालही आपल्यासमोर सादर करावा, असेही खंडपीठाने सांगितले.

कारखाना उभारण्यासाठीची बहुतांश रक्कम तर राज्य सरकारच देते, बाकीचा वाटा शेतकऱ्यांचा असतो व संचालक प्रत्यक्षात अत्यंत कमी रक्कम भरून सत्ताधारी होतात; मात्र हल्ली भ्रष्टाचारामुळे जवळपास सर्वच कारखाने डबघाईला आले असून, यात शेतकऱ्यांचा सर्वात जास्त तोटा झाला व सरकारचे अन् पर्यायाने जनतेचेही पैसे बुडाले; तरीही अजूनही नव्या कारखान्यांना परवानगी देण्याचे सत्र थांबले नाही, त्यामुळे जनतेचाच पैसा बुडित जाणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

सध्या अस्तित्वात असलेल्या बहुसंख्य कारखान्यांना गाळप क्षमताविस्तार करायला द्यायची काहीही गरज नाही. केवळ सोलापूर, नगर, धुळे, जळगाव, नांदेड येथील काही कारखान्यांना अशी संमती दिली जाऊ शकते; तसेच जे कारखाने मुळातच सशक्त आहेत, त्यांनाही अशी क्षमता वाढवू द्यायला हरकत नाही; मात्र क्षमता वाढविण्यासाठी त्यांना सरकारने अर्थसाह्य करू नये; तसेच आजारी कारखान्यांचे पुनरुज्जीवन करावे किंवा अन्य सशक्त कारखान्यांमध्ये त्यांचे विलीनीकरण करावे. नव्या कारखान्यांसंदर्भात उसासाठी उपलब्ध जमीन, पाण्याची मुबलकता व साखरेची गरज या बाबी ध्यानात घेऊन सरकारने बृहद् आराखडा करावा, असे देशमुख यांच्या अहवालात म्हटले आहे.

सहकारी साखर कारखान्यांना सरसकट विस्तार करू देऊ नये, असा मनाई आदेश उच्च न्यायालयाने २००६ मध्ये दिला होता; तरीही अनेक कारखान्यांनी आधुनिकीकरण, फेरबदल या नावाखाली जुनी यंत्रसामग्री काढून वाढीव क्षमतेची नवी यंत्रसामग्री आणली व विस्तार केला, असे कुलकर्णी यांनी सांगितले; तर सहकारी साखर कारखान्याच्या पदाधिकाऱ्यांनी जवळच आपला खासगी साखर कारखाना काढला, नंतर सहकारी कारखाना डबघाईला आला व खासगी कारखाना जोरात चालू लागला, अशीही उदाहरणे असल्याचे त्यांनी सांगितले. त्यावर या दोनही प्रकारची उदाहरणे आपल्याला द्यावीत, असेही खंडपीठाने सांगितले. पुढील सुनावणी सहा आठवड्यांनी होईल.

# 'पीएफ' बुडविणाऱ्या साखर कारखान्यांना दणका

मुंबई : कामगारांच्या भविष्यनिर्वाह निधीचे पैसे त्यांच्या खात्यात जमा न करता गिळंकृत करणाऱ्या सहकारी साखर कारखान्यांची यादी मोठी आहे. हे कारखाने राज्यातील सर्वच विभागात असून केवळ 'जस्ट सोसायटी'तर्फे उच्च न्यायालयात याचिका सादर झाल्यानेच आता त्यांच्यावर कारवाईचा दणका बसला आहे. आतापर्यंतची सर्व थकबाकी सुमारे नव्वद कोटी रुपयांच्या आसपास असून आतापर्यंत न्यायालयीन दणक्यामुळे त्यापैकी साधारण तीस कोटी रुपये वसूल झाले आहेत. यादीत जिल्ह्यातील वसंतदादा, महांकाली, माणगंगा, राजे विजयसिंह डफळे आणि निनाईदेवी या कारखान्यांचा समावेश आहे.

त्यांची चौकशी सुरू झाली आहे.

राज्यातील विविध विभागीय भविष्यनिर्वाह निधी आयुक्तांनी अशा चुकार कारखान्यांवर कारवाई सुरू करून त्यासंदर्भातील अहवाल नुकताच उच्च न्यायालयास सादर केला. त्यातील आकडेवारीनुसार काही कारखान्यांनी गेली तीस वर्षे हा निधी हडपला आहे. त्यामुळे काही कारखान्यांकडील 'पीएफ'ची थकबाकी अकरा कोटींपर्यंत गेली आहे. मात्र पीएफ आयुक्तांच्या कारवाईचा बडगा पाठीत बसताच काही कारखान्यांनी आपली देणी देण्यासही सुरवात केली आहे, असेही या कागदपत्रांवरून दिसून येते. जस्ट सोसायटीतर्फे अनुभवी वकील अभय नेवगी व राजेश मीरचंदानी यांनी गेली तीन वर्षे हा गोंधळ उघडकीस आणण्यासाठी न्यायालयात पुष्कळ प्रयत्न केले आहेत. आतापर्यंतची सर्व कारखान्यांची एकूण थकबाकी नव्वद कोटी रुपयांच्या घरात असून यापैकी तीस कोटी रुपयांपर्यंत रक्कम आतापर्यंत वसूल झाली आहे.

### ॲडव्हान्स रक्कम बंद करा

अनेक कारखाने 'पीएफ'च्या कचाट्यातून वाचण्यासाठी कामगारांना नियमित वेतन न देता, ॲडव्हान्स रक्कम देतात. त्यामुळे कारखाने त्या रकमेवर अर्थातच पीएफ कापत नाहीत. ही रक्कमही काही कोटी रुपयांच्या घरात आहे. हा देखील कर्मचाऱ्यांना लुटण्याचाच प्रकार असून त्यामुळे कारखान्यांच्या या प्रथेवर बंदी लादावी, अशी मागणी ॲड. नेवगी यांनी काल उच्च न्यायालयात केली.

**पी. एफ बुडविणाऱ्या कारखान्यांची यादी**

सविस्तर यादी अशी :

कोल्हापूर : इंदिरा गांधी भारतीय महिला कारखाना (भुदरगड) - यावर्षी ऑगस्ट ते ऑक्टोबर - चौकशी सुरु झाली.

भोगावती (शाहूनगर) - यावर्षी जुलै ते ऑक्टोबर - चौकशी सुरू झाली.

पंचगंगा (गंगानगर) - ऑगस्ट ०९ ते जून २०१० - थकबाकी १ कोटी ९४ लाख ६६ हजार ८२ रु., वसूल- एक कोटी ४ लाख २७ हजार. शिल्लक - ९० लाख ३८ हजार ५४७ रुपये.

कुंभी कासारी (ता. करवीर) - १२ कर्मचाऱ्यांना पीएफ चे लाभ न दिल्याबाबत चौकशी सुरु.

दौलत (ता. चंदगड) - सप्टेंबर २००८ ते जून २०१० - थकबाकी ३ कोटी १९ लाख ३८ हजार ७१३ रु. वसूल - ५१ लाख ४१ हजार ३६९ रु. शिल्लक - दोन कोटी ६७ लाख ९७ हजार ३४४ रुपये.

सांगली : वसंतदादा (माधवनगर) मार्च २००९ ते सप्टेंबर २०१० चौकशी सुरू झाली.

महांकाली (कवठेमहांकाळ) - जानेवारी २००८ ते ऑगस्ट २०१० - चौकशी सुरु झाली.

माणगंगा(आटपाडी) - ऑगस्ट २००८ ते सप्टेंबर २०१० - चौकशी सुरु झाली.

राजे विजयसिंह डफळे, जत - ऑक्टोबर २००८ ते सप्टेंबर २०१० - चौकशी सुरु झाली.

निनाईदेवी, ता. शिराळा - मार्च २००५ ते सप्टेंबर २०१० - चौकशी सुरु झाली.

सातारा: न्यू फलटण शुगर वर्क्स, फलटण - जानेवारी २००८ ते जुलै २०१० - चौकशी सुरु झाली.

किसनवीर, ता. फलटण - काही कामगारांबाबत नियमभंग - चौकशी सुरु झाली.

जरंडेश्वर, ता. कोरेगाव - (बंद) - ऑक्टोबर २००७ ते मे २०१० - थकबाकी पन्नास लाख ८३ हजार ५२ रुपये.



बोरगाव : येथे ऊस वजनकाटा उद्‌घाटनप्रसंगी खासदार राजू शेट्टी. शेजारी सुनील पाटील व इतर.

# ‘स्वाभिमानी’च्या प्रयत्नामुळे उसाला २ हजार दर

## खासदार राजू शेट्टी : बोरगावला ‘स्वाभिमानी’च्या वजनकाट्याचे उद्‌घाटन

बोरगाव : चालू वर्षीच्या गळीत हंगामामध्ये शेतकरी संघटनेच्या आंदोलनामुळे उसाला प्रतिटन २ हजार रुपये भाव मिळाला आहे. भविष्यातही शेतकऱ्यांच्या उद्धारासाठी संघटनेच्या माध्यमातून कटिबद्ध राहणार असल्याचा आशावाद स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक खासदार राजू शेट्टी यांनी व्यक्त केला. ते येथील शेतकरी संघटनेच्या माध्यमातून उभारलेल्या वजनकाटा उद्‌घाटनप्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रगतशील शेतकरी बाबासाहेब बंकापुरे होते. राजू खिचडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.

खासदार शेट्टी म्हणाले, ''देशातील साखरेच्या निर्यातीसंबंधी व शेतकऱ्यांच्या समस्येविषयी पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांच्याबरोबर सुमारे अडीच तास चर्चा केली. त्यावेळी या भागाचे खासदार कत्ती कोठे होते, असा सवाल करून त्यांनी कर्नाटकातील सत्ताधारी भाजप सरकारवर भ्रष्टाचाराचा आरोप केला.'' यावेळी त्यांनी परिसरातील ऊस उत्पादकांनी वजन काट्यावर उसाचे वजन करून कारखान्यांना ऊस पाठवावा, असे आवाहन केले. संघटनेचे उपाध्यक्ष उल्हास पाटील, जे. जे. मालगावे यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी संघटनेच्या दूध संकलन केंद्राचेही उद्‌घाटन करण्यात आले. कार्यक्रमास आदिनाथ हेमगिरे, सावकार मादनाईक, प्रकाश तेरदाळे, अण्णासाहेब चौगुले, उत्तम कदम, अंकुश कांबळे, सुनील पाटील, तात्यासाहेब बसन्नावर, बबन मुजावर, मौला आवटी, राजू लटलटे, नैनेश पाटील, अप्पासाहेब नेजे, रमेश पाटील, पंकज तिपन्नावर, भरत नसलापुरे, भगवानराव काटे, देवगोंडा पाटील, महादेव नेजे यांच्यासह मान्यवर, संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. राजू खिचडे यांनी सूत्रसंचालन केले. राजू लटलटे यांनी आभार मानले.

# 'सोमेश्वर'च्या आंदोलनाला हिंसक वळण

सोमेश्वरनगर : उसाला पहिली उचल बावीसशे मिळावी यासाठी सोमेश्वर कारखान्यावर आज झालेल्या आंदोलनाला हिंसक वळण लागले. शेतकरी कृती समितीचे नेते सतीश काकडे यांच्या अटकेनंतर आंदोलन उग्र झाले. पोलिस व आंदोलकांमध्ये जवळपास पाऊण तास तुफान धुमश्चक्री झाली. पोलिसांवर दगडांचा पाऊस पाडला. पोलिसांनीही आंदोलकांवर लाठीमार केला. जमाव पांगविण्यासाठी पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या. यात जवळपास पस्तीस जण जखमी झाले असून एसटी बस, पेट्रोलपंप, काही दुचाकी यांचेही नुकसान झाले आहे.

येथील शेतकरी कृती समिती व बारामती तालुका शेतकरी संघटनेच्या वतीने काल नीरा-बारामती रस्त्यावर नीरेनजीक रास्ता रोको होणार होता. मात्र, अतिरिक्त पोलिस अधीक्षक मेघश्याम मालेगावकर यांच्या मध्यस्थीने मागे घेण्यात आले होते. मात्र, आज सकाळपर्यंत कारखान्याने निर्णय न घेतल्याने सकाळी अकरा वाजता पुन्हा ऊस उत्पादक सभासद 'काटा बंद आंदोलन' करण्यासाठी कारखान्याजवळील करंजेपूल येथे जमा झाले. पोलिसांच्या विनंतीवरून आंदोलक सभासद तासभर कारखान्याच्या निर्णयाची वाट पाहिली. कारखान्यावर संचालक मंडळाची याच वेळी बैठक सुरू होती. कोणताही निर्णय न आल्याने काटाबंदचा निर्णय रद्द करून थेट संचालक मंडळालाच जाब विचारण्यासाठी आंदोलक निघाले. पोलिसांनी त्यांना अडविण्याचा प्रयत्न केला. मात्र आंदोलकांच्या संख्येपुढे आपले काही चालत नाही हे लक्षात आल्यावर पोलिसांनी जमावबंदी कायद्यानुसार सतीश काकडे यांना अटक केली.

काकडे यांना अटक करताच मोठा तणाव निर्माण झाला. आंदोलक चक्क पोलिस व्हॅनसमोर आडवे उभे ठाकले. पोलिसांनी सायरन वाजवत गाडी पुढे नेण्याचा प्रयत्न केला. मात्र, काही संतप्त आंदोलकांनी पोलिस व्हॅनवर दगडफेक केली. मग मात्र, पोलिसांनीही जोरदार लाठीमार सुरू केला. यामुळे जमाव आणखीच संतप्त झाला. सतीश काकडे यांना अटक केलेली गाडी पुढे सरकू द्यायची नाही, या उद्देशाने आंदोलकांनी थेट पोलिसांवरच दगडफेक सुरू केली. दगडांचा अक्षरशः पाऊस पडत होता. शिरस्त्राण घातल्याने काही पोलिसांचा बचाव झाला. पोलिसांनीही यास जोरदार प्रत्युत्तर दिले. कधी आंदोलक पोलिसांवर धावून येत होते तर कधी पोलिस आंदोलकांवर धावून जात होते. सर्व आंदोलक करंजेपूलच्या चौकात जमा झाले व पोलिसांवर तुटून पडले. पोलिसांनी पाच ते सहा अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या. करंजेपूल येथे आंदोलकांनी टायर पेटविले, रस्त्यावरून जात असलेल्या एका एसटीच्या काचा फोडल्या. पोलिस गाडीच्याही काचा फोडल्या. काही दुचाकींचे व सोमेश्वर कारखान्याच्या पेट्रोल पंपाचेही यात काहीसे नुकसान झाले. या अर्धा किलोमीटर परिसरात दगडांचा खच पडला होता.

काकडे यांची सुटका

आंदोलक हटत नसल्याचे पाहून पोलिसांनी सतीश काकडे यांनाच पुन्हा रस्त्यावर उतरवले. सतीश काकडे यांनी जवळपास वीस मिनिटे आंदोलकांना मार्गदर्शन केले. ''दगडफेक, टायर पेटविणे, पोलिसांवर हल्ला करणे हे अनुचित असून आपले भांडण संचालक मंडळाच्या विरोधात आहे. संचालक मंडळाला कारखाना परिसरात फिरू देऊ नका. पोलिसांनी मारहाण केली असेल तर त्यांचाही निषेध करतो. परंतु पोलिसांना त्यांचे काम करू द्या अशी कळकळीची विनंती करतो'' असे काकडे यांनी सांगितल्यावर आंदोलक पांगले. याप्रसंगी बघ्यांसह जवळपास हजारो लोक जमा झाले होते. करंजेपूल चौकात पेटवलेले टायर विझविण्यासाठी कारखान्याच्या अग्निशामन दलाची गाडी बोलविण्यात आली होती.

या धरपकडीत पंधरा ते सोळा पोलिस जखमी झाले आहेत. हवेत गोळीबार करण्याची वेळ आलीच नाही. मात्र, पाच ते सहा अश्रुधुराच्या नळकांड्या फोडाव्या लागल्या आहेत. तसेच शंभर ते दीडशे जणांना अटक करण्यात आली आहे, अशी माहिती सहायक पोलिस निरीक्षक विजय पाटील यांनी दिली. तर शेतकरी संघटनांचेही सुमारे वीस कार्यकर्ते जखमी झाले आहेत. सोमेश्वर कारखान्याच्या इतिहासात हिंसक वळण लागलेले हे पहिलेच आंदोलन आहे. पुणे जिल्ह्यातही इतके उग्र आंदोलन झाले नव्हते.

# ऊस वाहतूक व मजुरांसंदर्भात निर्णयांचा पाऊस

सांगलीः नियमबाह्य ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर ट्रॉल्या व ट्रक्सना चाप लावण्यासाठी आज जिल्हाधिकारी श्याम वर्धने यांनी बोलावलेल्या बैठकीत अनेक निर्णयांचा अवकाळी पाऊस पडला. साखर कारखानदारी अडचणीत असल्याचे कारण पुढे करीत बहुतेक संचालक अध्यक्षांनी तूर्त कठोर कारवाई नको, अशी विनंती जिल्हाधिकाऱ्यांना केली.

पाच वर्षांत ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांखाली ५२ जण चिरडले. केवळ या वर्षी ३० अपघातांत १७ ठार झाले आहेत. वाढत्या अपघातांची दखल घेत उपप्रादेशिक परिवहन विभागाने कारवाईचा धडाका लावताच गेल्या आठवड्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या बैठकीकडे पाठ फिरवणारे कारखानाचालक आजच्या बैठकीला मात्र अर्धा तास आधी हजर होते. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विलास कांबळे यांनी बहुतेक ट्रॉल्यांमध्ये सतरा ते अठरा टन ऊस वाहतूक सुरू असते, असे विधान केल्यानंतर कारखाना प्रतिनिधींनी अडचणींचा पाढा वाचण्यास सुरवात केली. जिल्हाधिकाऱ्यांनी मध्यस्थी करीत किमान काही बंधणे पाळणे आवश्यक असल्याचे ठासून सांगत कारखाना वाहनतळाच्या प्रवेशद्वारावर १३.८ उंचीचा ग्रेड सेप्रेटर (लोखंडी आडवा पोल) उभे करण्याचा निर्णय झाला. येत्या आठ दिवसांत असे सेप्रेटर उभारणे बंधणकारक करण्यात आले. टेप लावून तसेच एकच डिमर लाईट लावून चालवणाऱ्या वाहनचालकांवर कठोर दंडात्मक कारवाई करणे, मागील ट्रॉलीला तात्पुरते डेंजर लाईट उसाच्या मोळ्यांना लावण्याबाबत यावेळी सर्वसंमती झाली.

जिल्ह्यात ऊसतोड मजुरांची २ हजार ४२८ मुले शाळा सोडून कामावर आली असल्याचे सर्वेक्षणात स्पष्ट झाले आहे. प्राथमिक शिक्षणाधिकारी नागनाथ पाटील यांनी या मुलांना जवळच्या शाळेत पाठवण्याचे आवाहन केले. जिल्हाधिकाऱ्यांना या मुलांसाठी पहिल्या टप्प्यात कारखान्याच्या वाहन तळावर तात्पुरत्या शाळा उभारणे व तेथे जिल्हापरिषदेतर्फे अंगणवाडी शिक्षिका व प्राथमिक शिक्षक हजर ठेवण्यात येणार आहे. याशिवाय प्रत्येक वाहनतळावर आरोग्य तपासणीचाही निर्णय यावेळी झाला.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अश्विनीकुमार, अधिष्ठाता शेखर राजदेरकर, वसंतदादा कारखान्यांचे विशाल पाटील, सोनहिरा कारखान्याचे मोहनराव कदम, हुतात्मा कारखान्याचे ए. पी. देशमुख, मोहनराव शिंदे कारखान्याचे एस. एस. गोसावी, राजारामबापू कारखान्याचे पी. आर. पाटील, तासगाव कारखान्याचे कृष्णराव गोंजारी, विश्वास कारखान्याचे बी. डी. पवार, माणगंगा कारखान्याचे राजेंद्र देशमुख उपस्थित होते.

### बैठकीतील निर्णय

- **ऊस वाहतुकीच्या सर्व वाहनांना आवश्यक तेथे रिफ्लेक्टर बसवणार**
- **वाहनतळावर ऊसतोड मजुरांच्या मुलासाठी शाळा-पाळणाघरे**
- **भरलेल्या ऊस ट्रॉलीची उंची १३.८ फुटांपेक्षा जास्त असू नये यासाठी सेप्रेटर करणार**
- **रस्त्यावर बंद पडलेल्या ट्रॉल्या हटवण्यासाठी कारखान्यांमध्ये नियंत्रण कक्ष सुरू करणार**
- **ऊसतोड मजुरांसाठी तात्पुरत्या शौचालयाची व्यवस्था करणार**
- **ऊस वाहतुकीच्या चालकांसाठी प्रशिक्षण शिबिरे आयोजित करणार**
- **ऊसतोड मजुरांसाठी दरमहा वाहनतळावर आरोग्य तपासणी शिबिरे**

# पीएफ बुडविणाऱ्या कारखान्यांना चाप

मुंबई : आपल्या कामगारांना भविष्यनिर्वाह निधी (पीएफ) द्यावयास लागू नये म्हणून त्यांना नियमित वेतन न देता केवळ ठराविक रक्कम उचल (ॲडव्हान्स) म्हणून देणाऱ्या सहकारी व खासगी साखर कारखान्यांच्या मनमानीला उच्च न्यायालयाने चाप लावला आहे. या प्रथा बंद करण्याचा स्पष्ट आदेश न्यायालयाने विभागीय पीएफ आयुक्तांना दिला आहे.

कामगारांना त्यांचा हक्काचा पीएफ मिळत नसल्याबद्दल 'जस्ट सोसायटी'तर्फे ॲड्. अभय नेवगी व ॲड्. राजेश मिरचंदानी यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका (सिव्हिल अपिलेट पीआयएल ५४-२००७) सादर केली आहे. तिच्या सुनावणीदरम्यान न्या. बी. एच. मर्लापल्ले व न्या. यू. डी. साळवी यांच्या खंडपीठाने नुकताच हा आदेश दिला आहे. या आदेशाची अधिकृत प्रत उच्च न्यायालयाच्या संकेतस्थळावर नुकतीच उपलब्ध झाली आहे.

कामगारांना नियमित व रीतसर वेतन दिले, तर त्यांच्या 'पीएफ'पोटी कारखान्यांनाही रक्कम द्यावी लागते. ती द्यावी लागू नये, म्हणून कित्येक कारखाने कामगारांना वेतन न देता उचल देतात. अनेक कारखान्यांनी तर कामगारांना १२ ते १५ वर्षे उचलच दिली होती, यात कामगारांचा तोटा होऊन कारखानदार गब्बर होतात, अशी तक्रारही अर्जदारांच्या वकिलांनी सुनावणीदरम्यान केली होती. या मुद्द्याची गंभीर दखल घेऊन खंडपीठाने हा आदेश दिला.

या संदर्भात विभागीय पीएफ आयुक्तांनी संबंधित कारखान्यांचे रेकॉर्ड तपासावेत. जे कारखाने अशा प्रकारे 'पीएफ' भरावा लागू नये यासाठी कामगारांना वेतन न देता उचल देतात, त्यांच्यावर काय कारवाई केली, तसेच ही चुकीची प्रथा बंद करण्यासाठी काय पावले उचलली याचा अहवाल आयुक्तांनी द्यावा. हा अहवाल चार आठवड्यांत देण्यात यावा, असेही खंडपीठाने म्हटले आहे. राज्यातील साखर कारखान्यांनी कामगारांच्या 'पीएफ'ची रक्कम जमा न करून सुमारे ९० कोटी रुपये गिळंकृत केले आहेत, असा याचिकेतील मुख्य आरोप आहे.

# तीन हजार कोटींचा शेतकऱ्यांना फायदा

**खासदार शेट्टी : आता लक्ष्य साखर कारखान्यांतील भ्रष्टाचारावर**

जयसिंगपूर, ता. २३ : स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या ऊस आंदोलनामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना तीन हजार कोटींचा फायदा झाला. यापुढे कारखान्यांमधील भ्रष्टाचार रोखण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटना आंदोलन करणार असल्याचे प्रतिपादन खासदार राजू शेट्टी यांनी केले. संघटनेच्या राज्य कार्यकारिणीच्या येथील बैठकीत ते बोलत होते. प्रदेशाध्यक्ष सदाभाऊ खोत अध्यक्षस्थानी होते.

खासदार शेट्टी म्हणाले, ''ऊस आंदोलनांतून चांगले यश गाठता आले आहे. संघटनेची बांधणी करण्यासाठी राज्यभर दौरे केले जाणार आहेत. उसाला योग्य भाव मिळाल्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट होण्यास मदत होणार आहे. धनदांडग्यांना वठणीवर आणण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटना तत्पर आहे.

स्वाभिमानी ॲग्रोच्या माध्यमातून राज्यभर शेतीमाल घरपोच करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत; तसेच शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी नवनवीन प्रकल्प उभे करून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटना नेहमीच प्रयत्नशील राहील. राजकारणातील घोडेबाजार सर्वसामान्यांसाठी मारक असून जनतेच्या पैशावर निवडून

## 'स्वाभिमानी'च्या उमेदवारांचा विजय निश्चित : रमेश पाटील

मांगूर, ता. २५ : चिक्कोडी तालुक्यातील स्वाभिमानी शेतकरी संघटना पुरस्कृत सर्व उमेदवारांचा येणाऱ्या तालुका व जिल्हा पंचायत निवडणुकीत विजय निश्चित असल्याचा विश्वास संघटनेचे तालुका अध्यक्ष रमेश पाटील यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

श्री. पाटील म्हणाले, ''संघटनेचे संस्थापक अध्यक्ष खासदार राजू शेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली संघटनेच्या वतीने भोज, नेज, बोरगाव, कोगनोळी या चार जिल्हा पंचायतीसाठी तर शमनेवाडी, बोरगाव, कुर्ली, माणकापूर या चार तालुका पंचायतीसाठी संघटनेचे उमेदवार निवडणूक लढविणार आहेत.



## मांगूरमध्ये स्वाभिमानी दूध संकलन केंद्राचे उद्‌घाटन

मांगूर, ता. १७ : कारदगा (ता. चिक्कोडी) येथील स्वाभिमानी दूध संकलन संघाचे उद्‌घाटन खासदार राजू शेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले. खासदार शेट्टी म्हणाले, की आज शिरोळ तालुक्याबरोबरच चिक्ककोडी तालुक्यामध्ये गावागावांत स्वाभिमानीच्या दूध संकलन केंद्रे दुधाला योग्य भाव देण्यासाठी प्रयत्न करत आहे. आपले दूध या संघात संकलन करून आपला फायदा करून घेण्याचे आवाहन खासदार शेट्टी यांनी दूध उत्पादकांना केले.

या कार्यक्रमास कारदगा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू खिचडे, संजय गावडे, संतोष आळते, सुभाष टकाणे, पोपट गावडे, विजय कचरे, पोपट हिर्डीकर, रामा गावडे, सुहास पसारे, प्रकाश नोरजे यांच्यासह शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.



सौ. हालीमा मुजावर

## बोरगावला 'स्वाभिमानी'तर्फे हालीमा मुजावर

बोरगाव : तालुका पंचायतीच्या निवडणुकीसाठी काँग्रेस-भाजप यांना टक्कर देण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी, सुनील पाटील, तात्यासाहेब बसन्नावर यांच्या मार्गदर्शनाखाली सौ. हालीमा मुजावर या रिंगणात आहेत. बोरगाव तालुका पंचायतीवर तिरंगी लढत होणार असली तरी केवळ शेतकऱ्यांच्या मतावरच स्वाभिमानी संघटनेच्या सुनील पाटील, तातोबा बसन्नावर, देवगोंडा पाटील, राजू लटलटे, राजगौडा पाटील, रमेश मालगावे, विद्याधर हवले, शैलेश पाटील यांच्या पुढाकाराने त्यांना उमेदवारी मिळाली आहे.

# इस्लामपुरात वडाप चालक-मालकांचा मोर्चा

इस्लामपूरः सातारा, कोल्हापूर, रत्नागिरी जिल्ह्याप्रमाणे सांगली जिल्ह्यात वडाप चालू राहिलेच पाहिजे, वडाप व्यावसायिकांना पोलिसांचा त्रास कमी झालाच पाहिजे. वडापविषयीच्या जाचक अटी रद्द झाल्या पाहिजेत, या प्रमुख मागण्यांसाठी परवानाधारक रिक्षा, जीप चालक-मालक व मानवाधिकार संघटनेच्या वतीने आज येथील तहसील कार्यालय व पोलिस ठाण्यावर मोर्चा काढण्यात आला. वाळवा, शिराळा तालुक्यातील सुमारे अडीचशे ते तीनशे रिक्षा व जीप चालक - मालक आपल्या वाहनांसह या मोर्चात सहभागी झाले होते.

येथील प्रांताधिकारी कार्यालयासमोरील पटांगणात सर्व वडाप व्यावसायिक एकत्र जमले होते. त्या ठिकाणी मानवाधिकार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी वडाप व्यावसायिकांचे म्हणणे ऐकून घेतले. यात पोलिसांच्याकडून वडाप व्यावसायिकांच्यावर मोठा अन्याय होतो, रिक्षा किंवा जीपमध्ये परवान्यापेक्षा एखादा प्रवासी जादा असेल तर दंड आकारला जातो, एसटीला ५५ अधिक १२ अशी आसन क्षमता असतानाही नव्वद ते शंभर प्रवाशांची वाहतूक करतात, एसटीच्या केबीनमध्येही लोक बसलेले असतात. त्यांच्यावर कोणतीच कारवाई केली जात नाही. ट्रक, टँकर एसटी स्टँडच्या गेटसमोर उभे करून प्रवाशांची चढ-उतार करतात. त्यांच्यावर आरटीओ पोलिस, एसटी पिकअप यांच्याकडून कोणतीही कारवाई होत नाही. मग आम्ही परवानाधारक असूनही एखादा प्रवासी जास्त असेल तर आमच्यावर कारवाई केली जाते. शासनाच्या म्हणण्यानुसार सुशिक्षित बेरोजगारांनी पूर्वीच्या खासगी गाड्या विकून कर्जावर परवानाधारक प्रवासी वाहतूक गाड्या घेतल्या. या गाड्यांना दरमहा दहा हजारांचा हप्ता येतो. हा हप्ता भागत नाही. त्यामुळे आमच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. तसेच आमच्या गाड्यांवर दोन तीन महिन्यांनी निलंबनाची कारवाई केली जाते, अशी गाऱ्हाणी वडाप व्यावसायिकांनी मांडली. हे कुठेतरी थांबले पाहिजे, म्हणून आजच्या या विराट मोर्चाचे आयोजन करण्यात आले. शहरातील प्रमुख मार्गावरून घोषणाबाजी करत मोर्चा तहसील कार्यालयावर येऊन थडकला.

तहसीलदारांना आपल्या मागण्यांचे निवेदन देत मोर्चा इस्लामपूर पोलिस ठाण्यावर नेण्यात आला. पोलिसांनाही मागण्यांचे निवेदन देण्यात आले. मानवाधिकार संघटनेचे डॉ. जावेद शिकलगार यांनी या मोर्चाचे नेतृत्व केले. दरम्यान, या मोर्चाला खासदार राजू शेट्टी यांच्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेने पाठिंबा जाहीर केला.

# विलासराव, सानंदांचे पुतळे जाळले

## स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या आंदोलनाने सावकीर प्रकरण पुन्हा पेटले

बुलडाणा(स्वाभिमानी वृत्तसेवा): शेतकरी आत्महत्यांना कारणीभूत ठरलेल्या पाठराखण केल्याचे सिध्द झाल्याने, विलासरावांनी केंद्रीय मंत्रीपदाचा तत्काळ राजीनामा द्यावा व राज्यपालांनी सानंदा यांची आमदारकीपदावरून हकालपट्टी करावी या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने जिल्ह्यात बायगाव खुर्द मध्ये विलासराव देशमुख तर खामगाव व बोडखा येथे सानंदाचा पुतळा जाळून जोरदार आंदोलन केले. त्यामुळे जिल्ह्यात पुन्हा एकदा सावकारी प्रकरण पेटले आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवा प्रदेशाध्यक्ष रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वाखाली सदर आंदोलन करण्यात आले.

# खिद्रापूरपर्यंत नौकाविहारासाठी प्रयत्नशील

## खासदार शेट्टी : नृसिंहवाडीत देवस्थानचा भैरंभट भक्तनिवास लोकार्पण सोहळा



नृसिंहवाडी : भैरंभट भक्त निवासाचा लोकार्पण सोहळा झाला. या वेळी जगद्गुरु शंकराचार्य, खासदार राजू शेट्टी, माजी मंत्री प्रकाश आवाडे आदी.

नृसिंहवाडी : नृसिंहवाडी ते खिद्रापूरपर्यंत नौकाविहार सुरू झाल्यास या पर्यटन क्षेत्राचे महत्त्व वाढेल. त्या दृष्टीने आपण शासनदरबारी प्रयत्नशील राहू, असे प्रतिपादन खासदार राजू शेट्टी यांनी केले. नृसिंहवाडी येथे दत्त देवस्थानमार्फत बांधण्यात आलेल्या भैरंभट भक्तनिवास व एस.टी. पिकअप शेडच्या लोकार्पण संयुक्त सोहळा समारंभात ते बोलत होते. आमदार सा. रे. पाटील अध्यक्षस्थानी होते. जगद्गुरू शंकराचार्य यांच्या हस्ते यावेळी धर्मशाळा व पिकअप शेडचे उद्घाटन झाले.

आशीर्वचनामध्ये शंकराचार्य म्हणाले, ''शासन सध्या एखाद्या वास्तूसाठी 'बांधा वापरा व हस्तांतर करा' या योजनेचा अवलंब करते. मात्र. त्यापुढे जाऊन देवस्थानाने सामाजिक भूमिकेतून समाजासाठी सेवा परायण होण्याचे पाऊल उचलले आहे. हे सामाजिक क्रांतीचे द्योतकच मानावे लागेल. देवस्थानच्या सेवेसाठी सर्वांनी सहकार्य करावे.''

माजी मंत्री प्रकाश आवाडे म्हणाले, ''या तीर्थक्षेत्राचा लौकिक संपूर्ण महाराष्ट्रात आहे. मला स्वत:ला दत्तदर्शन घेण्यात खूप आनंद वाटतो. देवस्थानच्या धर्मशाळा, पिकअप शेड, महाप्रसाद, आरोग्य, रुग्णवाहिका या सेवा निश्चित कौतुकास्पद आहेत.''

आमदार पाटील म्हणाले, ''नृसिंहवाडीच्या वाढीव पार्किंगचा प्रश्न निकालात काढू. उपसरपंच राजेंद्र आणुजे यांनी त्यासाठी पाठपुरावा करावा.'' सरपंच सौ. राजश्री कांबळे, उपसरपंच श्री. आणुजे, दत्त देवस्थान अध्यक्ष अमोल विभुते, सचिव संतोष खोंबारे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी माजी देवस्थान अध्यक्ष वैभव काळू पुजारी यांनी स्वागत केले. सचिव संतोष खोंबारे यांनी प्रास्ताविक केले. अध्यक्ष विभुते, सरपंच सौ. कांबळे, उपसरपंच आणुजे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी मोफत रुग्णालय वाहिका व जनरेटर देण्याऱ्यांसह गुरुप्रसाद रिसबुड, दीपक कबाडे यांचा सत्कार झाला. आंतरराष्ट्रीय बुद्धिबळपटू ऋचा पुजारीस लॅपटॉप प्रदान केला. कार्यक्रमाला विश्वस्त गजानन पुजारी, प्रा. गुंडो पुजारी, श्रीकांत पुजारी, दिगंबर गेंडे, बाळकृष्ण रूक्के, मेघशाम पुजारी, ग्रामपंचायत सदस्य अनंत धनवडे, अभिजित जगदाळे, परशुराम गवंडी, अशोक पुजारी, संजय नंदगावे, विद्याधर आणुजे, सौ. मनीषा पतंगे, सौ. कांचन कंदले, प्रवीण आणुजे, प्रशांत कोडणीकर उपस्थित होते.

# शेतकऱ्यांच्या एकजुटीने उसाला दोन हजार ॲडव्हान्स : खासदार राजू शेट्टी

## भेंडवडेत शेतकरी मेळाव्यात खासदार शेट्टींचा सत्कार

खोची : कोल्हापूर व सांगली जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनी संघटितपणे ऊस दराचे आंदोलन केले म्हणूनच दोन हजार रुपयांपर्यंत पहिला ॲडव्हान्स मिळाला. अन्य जिल्ह्यांमध्ये अजूनही ऊस दरासाठी शेतकऱ्यांना संघर्ष करावा लागत आहे, असे प्रतिपादन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष खासदार राजू शेट्टी यांनी केले.

ते भेंडवडे (ता. हातकणंगले) येथील स्वाभिमानी दूध संस्थेच्या प्रथम वर्धापनदिन व शेतकरी मेळाव्यात बोलत होते. अध्यक्षस्थानी जिनपाल काका देसाई होते.

ते म्हणाले, ''शेतकऱ्यांना त्यांच्या उसाला योग्य मोबदला मिळाल्याशिवाय आंदोलन चालूच राहील. शेतकऱ्यांजवळ उसाचा आलेला पैसा परत बाजारपेठेत येतो व समाजातील सर्व थरांतील लोकांना रोजगार मिळतो. अन्य जिल्ह्यात शेतकऱ्यांची एकजूट नसल्याने त्यांना ऊस दरासाठी अद्याप संघर्ष करावा लागत आहे.''

सदाभाऊ खोत म्हणाले, ''राज्यकर्त्यांनी आपल्या पदाचा वापर फक्त स्वतःच्या स्वार्थासाठी केला आहे, परंतु खासदार शेटी यांनी निवडून येऊन शेतकऱ्यांना उसाचे जादा पैसे मिळवून दिले आहे.

स्वाभिमानी युवा संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र मालगावे म्हणाले, ''युवकांनी संघटित होऊन समाजासाठी चांगले विधायक काम करावे. व्यसनाच्या आहारी न जाता तरुण पिढीने स्वाभिमानाने जगावे.''

या वेळी उत्कृष्ट संसदपटू म्हणून पुरस्कार मिळाल्याबद्दल खासदार राजू शेट्टी यांचा सत्कार करण्यात आला.

या वेळी येथील महावीर नगरातील स्वाभिमानी युवा संघटनेच्या डिजिटल फलकाचे उद्घाटन खासदार शेट्टी यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमास सदाभाऊ खोत, जिल्हा परिषद सदस्य जयकुमार कोले, सांगली जिल्हा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अद्यक्ष पी. जी. पाटील, राजेंद्र मालगावे, अमित पाटील, सुनील देसाई, शांतिलाल देसाई, संदीप पाटील, यासीन परवाले, विजय महाडिक, अभिजित मालगावे, रामगोंडा पाटील तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक सुनील देसाई यांनी केले. आभार संदीप पाटील यांनी मानले.



जांबरे : येथे तीन हत्तींच्या कळपाने ऊस पिकाचे केलेले नुकसान.

# जांबरे परिसरात हत्तींच्या उपद्रवाने शेतकरी त्रस्त

चंदगड : दीड महिन्यापूर्वी तालुक्यात दाखल झालेल्या तीन हत्तींच्या कळपाचा सध्या जांबरे (ता. चंदगड) परिसरात वावर आहे. ऊस, भात, केळी, काजू पिकांचे या कळपाकडून प्रचंड नुकसान सुरू असल्याने शेतकऱ्यांतून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

हत्तींकडून होणाऱ्या नुकसानीचे वन विभागाकडून पंचनामे होतात. परंतु मिळणारी भरपाई अत्यंत कमी असून दिरंगाई असल्याने शेतकऱ्यांतून शासनाच्या कारभारावर नाराजी व्यक्त होत आहे. उसाला टनाचा दर दोन हजार असताना हत्तींकडून नुकसान झाल्यास अवघे चारशे रुपये दिले जातात. जांबरे प्रकल्पामुळे अल्पभूधारक झालेल्या शेतकऱ्यांना हा प्रश्न भेडसावत आहे. शेती कसण्यासाठी शेतात जाता येत नसेल, जीवाला धोका निर्माण होत असेल तर सर्वसामान्य माणसाने जगायचे कसे असा प्रश्न हे ग्रामस्थ विचारत आहेत. वन विभागाने खंदक मारून तारेचे कुंपण करावे, अशी मागणी विष्णू गावडे, नामदेव गावडे, यशवंत गावडे, लक्ष्मण

# येडेमच्छिंद्रला ज्योतिर्लिंग मंदिराचा जीर्णोद्धार

भवानीनगरः येडेमच्छिंद्र (ता. वाळवा) येथील ज्योतिर्लिंग मंदिराचा जीर्णोद्धार लोकवर्गणीतून करण्यात येणार आहे. खासदार राजू शेट्टी यांच्या निधीतून मंदिराच्या सभागृहासाठी ५ लाख १२ हजार निधी मंजूर झाल्याने मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी झालेल्या पहिल्याच बैठकीत ३० हजार रुपये लोकवर्गणी जमा झाली.

गावचे आराध्य दैवत असलेल्या ज्योतीर्लिंग मंदिराचा जीर्णोद्धार होण्याबाबतची इच्छा भाविकांतून वारंवार होत होती. खासदार निधीतून ५ लाख १२ हजार रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. सांस्कृतिक सभागृहाचे भूमिपूजन खासदार राजू शेट्टी यांच्या हस्ते होणार असल्याचे शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते डॉ. सचिन पाटील यांनी सांगितले.

मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी ४ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. पहिल्याच बैठकीत कृष्णा कारखान्याचे उपाध्यक्ष सुरेश पाटील, तंटामुक्तीचे अध्यक्ष पी. डी. पाटील व सुभाष मोहिते यांच्या वैयक्तिक ५ हजार रुपयांच्या देणगीबरोबर ३० हजार रुपयांची देणगी जमा झाली आहे. मार्च २०११ पर्यंत मंदिराचे काम पूर्ण करण्याचे ठरले आहे.

# ऊस उत्पादन वाढीचे तंत्र

उसाचे उत्पादन वाढविण्याकरिता महत्त्वाचे तंत्र वापर करून नवीन पध्दतीने लागवड करणे आवश्यक आहे, त्याच बरोबर पीक व्यवस्थापन ही महत्त्वाचे आहे. त्याचे अवलंबन करणे, उत्पादन वाढवणे ही काळाची गरज आहे. दिवसेंदिवस वाढत चाललेली व्यावसायिक स्पर्धेत तोंड देण्यासाठी कमी खर्चात अधिकाअधिक व उच्च दर्जाचे ऊस व साखर उत्पादन करण्याची गरज आहे. ऑगस्ट - सप्टेंबर महिन्यात ऊस उत्पादक लागवड केल्यास ऊस उगवण चांगली होऊन ऊस, उत्पादनात भर पडतो. म्हणून खालील महत्वाचे सुत्रे लक्षात ठेवून त्याचे पालन केल्यास ६० ते ७० टन एकरी उसाचे उत्पादन घेणे शक्य आहे तरी शेतकऱ्यांनी याचे पालन करावे.

१) जमिनीची पूर्व मशागत करून ती एक फुटापर्यंत भुसभुशीत करून व त्यात ३० ते ४० बैलगाड्या शेणखत व जीवाणू खते वापरून जमिन तयार करून घ्यावे.

२) जमिनीची तपासणी करून जमिनीचा पोत, सुपिकता प्रमाणे नत्र, स्फुरद व पालाश व सूक्ष्म अन्नघटक, कृषि खाते यांनी शिफारस केलेल्या संतुलीत प्रमाणात खत द्यावे.

३) उसाची उगवण चांगली होण्यासाठी उत्तम प्रतिचे त्याचे रसरशीत ६ ते ८ महिने वयाचे बियाणे, रोग व किडापासून मुक्त असलेले व भरपूर उगवण क्षमता असलेली चांगल्या प्रतिचे बियाणे वापरावे

४) लागणीपूर्वी बेणे चांगले डोळे असलेली एक अथवा दोन डोळ्याची कांड्या तयार करून किटनाशक व बुरशीजन्य औषधात बुडवून, जमिनीत फोरेट किंवा क्लोरोपारी फॅस १० किलो पेरून लागण करावा.

५) उसाची फुटवे जगण्याचे प्रमाण वाढविण्यासाठी व प्रत्येक ऊस वाढविण्यासाठी सरीतील अंतर हलक्या जमिनीत ४ ते ४.५ फूट व काळी भारी निचऱ्याच्या जमिनीत ५ ते ६ फूट रूंद सरी ठेवावी. यामुळे भरपूर सूर्य प्रकाश मिळून प्रत्येक उसास वाढीसाठी पुरेशी जागा मिळतो. व बैलजोडी यंत्राद्वारे अंतरमशागत करण्यास सोयीचे जाते.

६) फुव्याची एकत्रीत वाढ होऊन उसास रूपांतर होण्यासाठी लागवडीच्या वेळी स्फूरद मात्रा व सेंद्रिय खताची गरज फारच आहे. तसेच फुटवे पुरेसे मिळवण्यासाठी वेळोवेळी मातीची भर देण्याची जरूरी आहे.

७) पूर्व हंगामात लागवड करावयाच्या उसासाठी नत्र १३६ कि. स्फूरद ६८ कि. पालाश ७० कि. एकरी यांचा संतुलित वापर ५ ते ६ महिन्यापर्यंत खत विभागून ते उसाच्या मुळाभोवती चळी घेऊन खत पेरणी करणे जरूरीचे आहे.

८) उसाला वेळोवेळी व संतुलित पाणी व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. जादा पाणी व कमी पाणी दोन्ही ऊस उत्पादनाच्या दृष्टीने हानीकारक आहेत. उन्हाळ्यात ७ ते ८ दिवस पावसाळ्यात गरजेप्रमाणे व हिवाळ्यात १२ ते १४ दिवसांनी पाणी देणे आवश्यक आहे.

९) उसाला ठिबक सिंचनाव्दारे देणाऱ्या पाण्यात ३० टक्के बचत होते. व पाण्याच्या पुरवठा मुळाच्या आजूबाजूस होतो. ठिबकमुळे ८ महिन्यापर्यंत अन्नद्रव्याचा पुरवठा उसाला करणे शक्य होतो.

१०) फुटव्यांती सारखी वाढ होण्यासाठी पीक वाढीचे अवस्थेत गरजेनुसार खत मात्रा द्यावेत व रासायनिक खते नेहमी सेंद्रिय खतात मिसळून द्यावीत.

११) ऊस पिकातील तणांचा बंदोबस्त वेळीत करणे, जमिन पोकळ करणे, मुळांचे वाढीला योग्य वातावरण करण्यासाठी अंतरमशागतीचे महत्त्व आहे. लागवड केल्यापासून ४ ते ५ महिन्यापर्यंत जमिन तणापासून मुक्त ठेवणे अत्यंत जरूरीचे आहे. तण जमिनीत राहिल्यास उत्पादनावर परिणाम होतो.

१२) उसाचे जास्तीत जास्त उत्पादन घेण्यासाठी एकरी सरासरी ६० हजार ऊस आणि प्रत्येक उसाचे वजन सरासरी २ किलोच्या आसपास असण्याचे दृष्टीने प्रयत्न करावा.



१३) किड, रोग यामुळे उसाचे नुकसान होऊ नये म्हणून पिक संरक्षण तंत्रज्ञानाचा वेळेवर उपाय करावेत.

मुख्यत : उसाचे उत्पादन रोपाची संख्या फुटव्याची संख्या व उसाचे वजन यावर अवलंबून असते. म्हणून जादा उत्पादन रोपाची संख्या व उसाचे वजन यावर अवलंबून असते. म्हणून जादा उत्पादन मिळण्यासाठी वरील तंत्रज्ञानाचा वापर करून कमी खर्चात अवलंबून असते म्हणून जादा उत्पादन मिळण्यासाठी वरील तंत्रज्ञानाचा वापर करून कमी खर्चात जास्त उसाचे उत्पादन मिळू शकते. म्हणून त्याचा फायदा शेतकरी बंधूनी घ्यावा. त

**पिक-पाणी**

**डॉ. जिनेंद्र धनपाल चौगुले**
प्लॉट नं. २९, चंद्रधन, माहेर हॉस्पिटलजवळ नांदणी रोड, जयसिंगपूर. येथे संपर्क साधावा. फोन २२४५१९. मो. ९९२२७७२८९५